




दैनिक **युवावार्ता**

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25








वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ७९ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । ०१/०४/२०२६ । पान - ६







# सलग दुसऱ्या दिवशी संगमनेर तालुक्याला अवकाळीचा तडाखा

## शेतकरी हवालदिल, हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान







सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या वादळी व गारपीटीमुळे उभी पीके भुईसपाट झाली तर राहाता तालुक्यात वीजेची तार तुटून गोठ्यावर पडल्याने ९ गायींचा मृत्यू झाला

संगमनेर (प्रतिनिधी) -

रविवारी तालुक्याच्या पश्चिम भागात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला होता. त्यावेळी आश्वी परिसर बचावला होता; मात्र सोमवारी सकाळपासूनच वाढलेल्या उकाड्यानंतर दुपारनंतर अचानक वातावरणात बदल झाला. सायंकाळी चारच्या सुमारास काळ्या ढगांची दाटी होत वादळी वाऱ्यासह पावसाची रिपरिप सुरू झाली. तालुक्यातील आश्वीसह पंचक्रोशीतील गावांना सोमवारी (दि. ३०) दुपारनंतर अवकाळी पावसासह वादळी वाऱ्याचा जोरदार तडाखा बसला. अचानक बदललेल्या हवामानामुळे विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा आणि पावसाच्या सरींमुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मोठी धावपळ उडाल्याचे चित्र दिसून आले.

सोमवारी आठवडे बाजार असल्याने शेतकरी व ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र, पावसाच्या धास्तीने बाजारात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अनेक विक्रेत्यांनी आपला भाजीपाला व माल कमी दरात विकून तातडीने घरी जाणे पसंत केले. त्यामुळे बाजारातील उलाढालीवरही परिणाम झाला.

दरम्यान, सध्या गव्हाचे पीक काढणीच्या अवस्थेत असून, पावसाचा जोर वाढल्यास मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कांदा, आंबा, द्राक्ष, डाळिंब तसेच टरबूज यांसारख्या पिकांनाही फटका बसण्याची शक्यता आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाईल की काय, या चिंतेत बळीराजा सापडला आहे.

वादळी वाऱ्यासह गारपिटीचाही काही भागांना फटका बसला. **वडगाव लांडगा, निमगाव बुद्रुक, निमगाव खुर्द, मेंगाळवाडी, गाडी, सावरचोळ आणि पेमगिरी** या गावांत गारपीट झाल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. निमगाव पागा परिसरात तर तुफान गारपीट होऊन गहू, टोमॅटो, कांदा, काकडी आदी पिकांचे मोठे नुकसान झाले.

रविवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे धांदरफळ, निमोणसह अनेक गावांमध्ये पिके भुईसपाट झाली होती. काही ठिकाणी घरांची पत्रे उडाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत.

कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार, २६ ते २९ मार्च दरम्यान संगमनेर, अकोले आणि अहिल्यानगर तालुक्यातील १२ गावांमधील एकूण १,१०४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून २,७०३ शेतकरी बाधित झाले आहेत.

यापैकी सर्वाधिक फटका संगमनेर तालुक्याला बसला असून ७ गावांतील १,००६ हेक्टर क्षेत्रावरील गहू, कांदा, मका, भाजीपाला आणि डाळिंब पिकांचे नुकसान झाले आहे. यात २,४८५ शेतकरी बाधित झाले आहेत. अकोले तालुक्यातील ४ गावांमध्ये ९६.५० हेक्टरवरील पिकांचे नुकसान होऊन २१६ शेतकरी बाधित झाले आहेत, तर अहिल्यानगर तालुक्यात एका गावात १ हेक्टरवरील भाजीपाला, वाल व टोमॅटो पिकांचे नुकसान झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पाऊस टप्याटप्प्याने कोसळत असून गत आठवड्यात १४४ गावांतील १५,५५८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. याचा फटका १५,३५२ शेतकऱ्यांना बसल्याचे अहवालात नमूद आहे. सध्या महसूल व कृषी विभागाकडून अंतिम पंचनामे सुरू आहेत.

अवकाळी पावसाच्या सततच्या तडाख्यामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर नव्या अडचणी उभ्या राहिल्या असून तातडीने मदतीची मागणी होत आहे.

# संगमनेर शहरात महावीर जयंती उत्साहात

## मिरवणुकीतून दिला शांततेचा संदेश





प्रसाद सुतार (शिरसाठ)संगमनेर

युवावार्ता (प्रसाद सुतार)

संगमनेर - अहिंसेचे पुजारी आणि जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जन्मोत्सवानिमित्त (महावीर जयंती) आज संगमनेर शहरात जैन बांधवांच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली. जगा आणि जगू द्या हा संदेश देत अत्यंत शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात आलेल्या या मिरवणुकीने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले.

मिरवणुकीचे मुख्य आकर्षण भगवान महावीरांची प्रतिमा असलेला सुशोभित रथ होता. पाच सुवर्णरंगी अश्वांच्या प्रतिकृती असलेला हा रथ अतिशय देखणा दिसत होता. तसेच, काही भाविकांनी चांदीची पालखी आपल्या खांद्यावर वाहून नेली. 'त्रिशला नंदन वीर की, जय बोलो महावीर की' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

मिरवणुकीत जैन समाजातील महिला, तरुण आणि बालके मोठ्या संख्येने सहभागी झाली होती. लहान मुली आणि महिलांनी पांढऱ्या आणि केशरी रंगाचे पारंपरिक परिधान केले होते.

हातात जैन धर्माचे ध्वज घेऊन अनेक तरुण मिरवणुकीत चालत होते. अनेकांनी अनवाणी चालून भगवान महावीरांप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. शहरातील प्रमुख मार्गांवरून ही मिरवणूक काढण्यात आली. भगवान महावीरांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत, हेच या मिरवणुकीच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले. मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी जैन समाज बांधवांनी चोख नियोजन केले होते. या सोहळ्यामुळे शहरात चैतन्याचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

# चाकणकर होणार चौकशीत हजर

नाशिक (प्रतिनिधी)

भोंदू खरात प्रकरणात एसआयटीने महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. काल त्या चौकशीसाठी येणार असल्याची चर्चा होती मात्र त्यांनी आजारपणाचे कारण देत उपस्थित राहणे टाळले. त्यामुळे मंगळवारी त्या नाशिकमध्ये येऊन जबाब नोंदवणार आहे असे त्यांनी म्हंटले आहे. चाकणकरांसह शिवनिका संस्थानच्या आजी-माजी ट्रस्टींचीही चौकशी होणार असल्याची माहिती समोर आली आहे. चाकणकरांविरोधात कारवाईची मागणीही जोर धरू लागली आहे. ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे, राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली पाटील-ठोंबरे, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि तृप्ती देसाई यांनी या प्रकरणात आक्रमक भूमिका घेतली आहे.

# इस्फहानवर अमेरिकेचा भीषण हल्ला

## २,००० पौंड बंकर-बस्टर बॉम्बचा वापर



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिकेच्या लष्कराने इराणमधील इस्फहान येथील एका मोठ्या दारूगोळ्याच्या गोदामाला लक्ष्य केले. या हल्ल्यात २,००० पौंड वजनाच्या बंकर-भेदी बॉम्बसह इतर अनेक धोकादायक बॉम्ब वापरण्यात आले. ट्रम्प यांनी 'ट्रुथसोशल'वर रात्रीच्या आकाशात प्रचंड स्फोट दाखवणारा एक व्हिडिओ पोस्ट केला. हा हल्ला ज्या क्षणी झाला, त्याच क्षणी या व्हिडिओमध्ये चित्रित झाला असल्याचे मानले जाते.

वॉल स्ट्रीट जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार आणि एका अमेरिकी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने इराणच्या इस्फहान शहरातील एका मोठ्या दारूगोळ्याच्या गोदामावर २,००० पौंडांचे बंकर-बस्टर बॉम्ब वापरले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनीही 'ट्रुथ सोशल'वर एक कॅप्शन नसलेला व्हिडिओ शेअर केला, ज्यामध्ये रात्रीच्या आकाशात अनेक स्फोट होताना दिसत आहेत. अधिकाऱ्याने सांगितले की, हा व्हिडिओ प्रत्यक्ष हल्ला कसा झाला हे दाखवतो. वॉल स्ट्रीट जर्नलनुसार, या हल्ल्यात मोठ्या प्रमाणात भेदक दारुगोळा वापरण्यात आला, ज्यामुळे भूमिगत आणि तटबंदी असलेल्या ठिकाणांचे मोठे नुकसान झाले.

इस्फहान हे मध्य इराणमधील एक प्रमुख शहर आहे, जे राजधानी तेहरानच्या दक्षिणेला झायंदेह नदीच्या काठावर वसलेले आहे. इराणने आपला सुमारे ५४० किलोग्रॅम अत्यंत संवर्धित युरेनियमचा काही भाग इस्फहान शहरातील भूमिगत सुविधांमध्ये हलवला असल्याचे म्हटले जाते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी इराणच्या ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याची धमकी दिली. ज्यात देशाच्या क्षारविरहितीकरण प्रकल्पांचा समावेश आहे. अशा प्रकारच्या कृतींमुळे पाणीटंचाई असलेल्या मध्य-पूर्वेवर विनाशकारी परिणाम होऊ शकतात. ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये ट्रम्प म्हणाले की, जर युद्ध संपवण्यासाठी लवकरच करार झाला नाही. तसेच ज्यामधून टँकरद्वारे मोठ्या प्रमाणात तेलाची वाहतूक होते ती होर्मुझची सामुद्रधुनी तात्काळ उघडली नाही, तर आम्ही इराणचे सर्व वीज प्रकल्प, तेल विहिरी आणि खारग बेटांना उडवून देऊन पूर्णपणे नष्ट करू. ज्यांना आम्ही अद्याप हात लावलेला नाही.











# प्रशासकीय इमारतीसमोर शॉर्ट सर्किट




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील प्रशासकीय इमारतीसमोरील झाडांच्या फांद्या विद्युत तारांना घासल्याने सोमवारी (दि. ३०) सायंकाळी अचानक शॉर्ट सर्किट होऊन ठिणग्या उडाल्या. अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे ही धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती.

प्रांत कार्यालय, वन विभाग, डीवायएसपी कार्यालय, पोस्ट व उपनिबंधक कार्यालयासह अनेक शासकीय कार्यालये असणाऱ्या प्रशासकीय इमारतीजवळ ही घटना घडली. झाडांची वेळेवर छाटणी न झाल्याने जाड फांद्या वाऱ्याने हलत विद्युत तारांना आदळून स्पार्किंग सुरू झाले. काही वेळातच झाडांनी पेट घेतल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

सुदैवाने त्या वेळी परिसरात गर्दी किंवा वाहनांची वर्दळ नसल्याने मोठा अपघात टळला. नागरिकांनी तात्काळ वीज वितरण कर्मचाऱ्यांना पाचारण करून वीजपुरवठा खंडित केला व फांद्या दूर करण्यात आल्या.

संवेदनशील सरकारी इमारतीसमोरच अशी घटना घडल्याने प्रशासनाच्या हलगर्जीपणावर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# कंपनी दिवाळखोर झाल्यास आधी कामगारांचे पैसे; नवीन कायदा मंजूर

मुंबई (वृत्तसंस्था)

लोकसभेने ३० मार्च रोजी दिवाळखोरी कायद्यातील बदलांचे विधेयक मंजूर केले. आता कोणतीही कंपनी दिवाळखोर झाल्यास तिची मालमत्ता विकून जो पैसा मिळेल, त्यातून सर्वात आधी कामगार आणि कर्मचाऱ्यांचे थांबलेले वेतन आणि थकबाकी दिली जाईल. त्यानंतरच इतर लोकांना पैसे दिले जातील.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या की, ही नवीन प्रणाली जुन्या फास्ट-ट्रॅक प्रक्रियेची जागा घेईल, कारण जुनी व्यवस्था व्यवस्थित काम करत नव्हती. याशिवाय, आता एकाच समूहातील अनेक कंपन्या आणि परदेशात अडकलेल्या त्यांच्या मालमत्तेशी संबंधित वाद सोडवणेही सोपे होईल.



संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आश्वासन दिले की, दिवाळखोरी प्रक्रियेदरम्यान कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष केले जाणार नाही. त्या म्हणाल्या की, कायद्यात अशी तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे कामगारांची थकबाकी देयकांच्या यादीत वरच्या स्थानावर ठेवली जाईल. सुधारणा विधेयकाचा आणखी एक मोठा फायदा हा आहे की, आता दिवाळखोरीची प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत. एखाद्या कंपनीचा डिफॉल्ट (कर्ज फेडण्यास असमर्थता) सिद्ध होताच, त्याविरुद्ध दिवाळखोरीचा अर्ज १४ दिवसांच्या आत स्वीकारणे बंधनकारक असेल. यामुळे संपूर्ण प्रक्रिया वेगवान होईल आणि कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी अनेक वर्षे वाट पाहावी लागणार नाही.माहितीनुसार, सरकारने १२ ऑगस्ट २०२५ रोजी हे सुधारणा विधेयक लोकसभेत सादर केले होते. त्यानंतर ते निवड समितीकडे पाठवण्यात आले होते. समितीने डिसेंबर २०२५ मध्ये आपला अहवाल दिला, ज्याच्या आधारावर आता ते मंजूर करण्यात आले आहे. २०१६ मध्ये पहिल्यांदा लागू झाल्यापासून खइउ मध्ये आतापर्यंत एकूण ७ वेळा सुधारणा करण्यात आल्या आहेत.

# जबाबदारी कळत नसेल तर राजीनामा द्या

## सपकाळांचा तटकरे यांना टोला

मुंबई (वृत्तसंस्था)

मागील काही दिवसांपासून नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण चांगलेच गाजत आहे. महिलांवरील शंभरपेक्षा अधिक लैंगिक अत्याचारांचे व्हिडिओ समोर आले आहेत. तसेच आर्थिक फसवणुकीचे देखील गुन्हे खरातवर दाखल झाले आहेत. विशेष लक्ष वेधले गेले ते त्याच्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांमुळे. मात्र, असे असूनही राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्याकडून यावर अद्याप कुठलीच प्रतिक्रिया आलेली नाही. यावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टीका केली आहे. आपली जबाबदारी माहीत नसेल तर राजीनामे देऊन घरी बसावे, असे सपकाळ यांनी टीका करताना म्हटले आहे.

या आहेत आपल्या राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे. राज्य सरकारमधील महिलांचा आवाज किंवा महिलांची जबाबदारी असलेल्या खात्याच्या त्या मंत्री आहेत, असे म्हणत हर्षवर्धन सपकाळ यांनी अदिती तटकरे यांचा फोटो शेअर करत टीका केली आहे. ते म्हणाले, मागील काही दिवसांमध्ये खरात प्रकरण असो, यात यांच्या खात्याअंतर्गत येणाऱ्या महिला आयोगाच्या अध्यक्षांवर झालेले आरोप असो, हृषीकेश वैद्य, काल समोर आलेलं नवी मुंबईतील आदर्श म्हात्रे प्रकरण असो. रोज राज्यातील महिला भगिणींसोबत अत्याचार झाल्याच्या बातम्या, प्रकरणं समोर येत आहेत. पण, आपल्या महिला व बालविकास मंत्री बेपत्ता आहेत. या सर्व घटनांवर काही एक प्रतिक्रिया आपण त्यांची ऐकलीय का? किंवा या प्रकरणानंतर याबाबत त्यांच्या खात्याअंतर्गत यावर एखादी बैठक घेतली काय? याबाबत राज्यातील पोलिस महासंचालकांना त्या भेटल्यात का? असा सवाल हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित केला आहे. तसेच राज्यातील पिडीत महिलांना न्याय मिळेल, असा विश्वास देणारं ट्विट किंवा पोस्ट तरी त्यांनी केलीय का? जर या मंत्री महोदयांना स्वतःची जबाबदारी काय आहे, हेच समजत नसेल, तर यांनी राजीनामे देऊन घरी बसावं. आणि आपल्या वैयक्तिक आयुष्यात वेळ घालवावा.

# जिल्हा बँकेसह तीन साखर कारखान्यांच्या निवडणुका लांबणीवर

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यात जाहीर झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीमुळे सहकार विभागाने अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ मे २०२६ पर्यंत पुढे ढकलल्या आहेत. याबाबत सहकार विभागाने सोमवारी यासंदर्भातील शासन आदेश जारी केला. या आदेशाच्या दिनांकापासून सध्या सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर ३१ मे पर्यंत लांबणीवर टाकण्यात आल्या आहेत. या आदेशातून सहकारी गृहनिर्माण संस्थांना वगळण्यात आले आहेत. यामुळे नगर जिल्ह्यातील जिल्हा बँकेसह ज्ञानेश्वर, मुळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांची निवडणुका दिवाळीपर्यंत लांबवणार आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे अनुक्रमे बारामती, राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी येत्या २३ एप्रिल रोजी मतदान होत आहे. या पोटनिवडणुकीमुळे प्रशासनिक आणि पोलीस यंत्रणा व्यग्र राहणार आहे. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळ, पोलीस बंदोबस्त, मतदान केंद्रांची उपलब्धता याबाबत अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे आदेशात म्हटले आहे.




परंतु, विभागाने सहकारी संस्थांच्या निवडणुकीनंतरची पहिली पदाधिकारी निवड करणे, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या राजीनाम्यामुळे अन्य पदाधिकार्यांची निवड करणे, पदाधिकार्याचा राजीनामा, मृत्यूमुळे रिक्त झालेल्या जागेवर अन्य संचालकांची निवड करणे, क आणि ड वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया, ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत नामनिर्देशनाचा टप्पा सुरु झाला आहे, अशा निवडणुकांना हा आदेश लागू राहणार नसल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे. याबाबत सोमवारी सायंकाळी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी स्वतंत्रपणे आदेश काढले आहेत.

# नक्षलमुक्त भारतासाठी सरकार ठाम

## अमित शहा यांचा काँग्रेसवर हल्ला

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लोकसभेत नक्षलमुक्त भारतासाठी सरकारच्या प्रयत्नांवर उत्तर देत आहेत. शहा म्हणाले- आदिवासींना अनेक वर्षांपासून त्यांच्या समस्या समोर याव्यात असे वाटत होते, पण अनेक वर्षे त्यांना संधी दिली गेली नाही. शहा म्हणाले- १९७० ते २०२६ पर्यंत चाललेल्या नक्षलवादाच्या घटनाक्रमावर संसदेत चर्चा होत आहे. जे लोक नक्षलवादाचे समर्थन करतात, त्यांना मी विचारू इच्छितो की, हे सर्व १९७० पासून आतापर्यंत का झाले नाही?

गृहमंत्री म्हणाले- मी काँग्रेसला विचारू इच्छितो की, ७५ वर्षांपैकी ६० वर्षे तुम्ही राज्य केले, मग आदिवासी विकासापासून का वंचित राहिले?



६० वर्षे घरे, शाळा, मोबाईल टॉवर पोहोचू दिले नाहीत आणि आता हिशोब मागत आहात. स्वतःच्या अंतर्मनात डोकावून बघा. सोमवारी संसदेत नक्षलवादावर चर्चा होत आहे. ही चर्चा सरकारने दिलेल्या अंतिम मुदतीपूर्वी एक दिवस आधी होत आहे. शहा यांनी अनेकदा ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे संपवण्याची घोषणा केली आहे.बस्तरमधून नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात आला आहे: बस्तरमधून नक्षलवाद जवळजवळ पूर्णपणे संपुष्टात आला आहे. बस्तरमधील प्रत्येक गावात शाळा उघडण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली. या भागातील प्रत्येक गावात शिधावाटपाची दुकाने उघडण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली. प्रत्येक तहसील आणि पंचायतीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि सामुदायिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. लोकांना आधार कार्ड आणि शिधावाटप कार्ड देण्यात आले आहेत, आता त्यांना पाच किलो धान्य मिळते.

# कुपोषणाविरुद्ध महाराष्ट्राची मोठी मोहीम

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील कुपोषणावर प्रभावी नियंत्रण मिळवून महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन यांच्यात पाच वर्षांचा सामंजस्य करार करण्यात आला असून, या भागीदारीमुळे मातृ व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक



इनिशिएटिव्ह्ज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सारख्या थेट लाभहस्तांतरण योजनांचा लाभअधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये सघन अंमलबजावणी करण्यात येणार असून, राज्यस्तरावरही तांत्रिक साहाय्य दिले जाणार आहे.

तसेच, सीआयएफएफ कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करून प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे. पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक साहाय्य आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल-टाइम निरीक्षण, डेटाआधारित निर्णय प्रक्रिया आणि सक्षम मॉनिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे.

# लाच स्वीकारताना अभियंत्याला अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - रस्ते कामाचे बिल मंजूर करून देण्यासाठी तक्रारदाराकडून ३ लाख रूपयांची लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने झेडपीच्या उपविभागीय अभियंत्याला अटक केली. कारवाई पथकाने जिल्हा परिषदेच्या कार्यालयात सोमवारी (दि. ३०) केली. या प्रकरणातील शाखा अभियंता फरार असून, त्याचा शोध घेतला जात आहे. विठ्ठल बालाजी पठाडे (५६) असे अटक केलेल्या जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग, चांदवडच्या उपविभागीय अभियंत्याचे नाव आहे. तर कृष्णकांत जिभाऊ देवरे (२८) असे फरार झालेल्या शाखा अभियंत्याचे नाव आहे.तक्रारदाराने जिल्हा परिषद बांधकाम विभागामध्ये कंपनी नोंदणीकृत केली आहे. त्यांच्या कंपनीच्या नावाने (ता. हद्द ते बच्छाव वस्ती उसवाड कळमदरे, डोंगरगाव निकम वस्ती ते रामा-२४ रस्ता) इजिमा २७९ मध्ये सुधारणा व डांबरीकरण करण्यासाठी चांदवड तालुका अंदाजपत्रक रक्कम ९० लाख रूपयांची निविदा प्रसिद्ध झाली. त्यापैकी तक्रारदारांना ७२ लाख ८९ हजार ७२८ रूपये पार्टनुसार रस्ता डांबरीकरणाचे काम मिळाले होते. या कामाचे टप्प्याटप्प्याने तक्रारदारांना ४१ लाख रूपये मिळाले होते. उर्वरित १० लाख रुपये बिल येणे बाकी होते. या बिलाची मागणी तक्रारदाराने पंचायत समिती कार्यालयात केली होती. मात्र, तक्रारदारांना आधीच्या बिलाच्या मोबदल्यात बक्षीस म्हणून आणि सध्याचे बिल बनवून मंजूर करण्यासाठी विठ्ठल पठाडे याने ३ लाख रूपये आणि कृष्णकांत देवरे याने २ लाख ६७ हजार रूपये लाचेची मागणी केली.

# जनगणना २०२७ मध्ये मोठा बदल

## लिव्ह-इन जोडपी आता ‘विवाहित’ म्हणून नोंदवणार



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

भारताच्या आगामी जनगणनेमध्ये एक अत्यंत क्रांतिकारी आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा बदल पाहायला मिळणार आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या नवीन निर्णयानुसार, आता लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांची गणना देखील ‘विवाहित’ म्हणून केली जाणार आहे. या निर्णयामुळे देशातील सामाजिक आकडेवारी संकलित करण्याच्या पद्धतीत मोठा बदल होणार आहे. २०२७ च्या जनगणनेसाठी तयार करण्यात आलेल्या नवीन नियमावलीत लिव्ह-इन जोडप्यांना वेगळ्या श्रेणीत न ठेवता त्यांना विवाहित जोडप्यांच्या समकक्ष मानले जाईल. आतापर्यंत जनगणनेमध्ये केवळ कायदेशीररित्या विवाहित असलेल्या लोकांचीच नोंद ‘विवाहित’ म्हणून केली जात असे. मात्र बदलत्या सामाजिक परिस्थितीचा विचार करून सरकारने हा निर्णय घेतला आहे. लिव्ह-इन मध्ये राहणाऱ्या महिला आणि मुलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांना अधिकृत ओळख देण्यासाठी हा बदल उपयुक्त ठरेल. देशात लिव्ह-इन मध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या मोठी आहे. त्यांची नोंद विवाहित म्हणून केल्यास लोकसंख्या आणि कौटुंबिक स्थितीची अधिक अचूक आकडेवारी सरकारकडे उपलब्ध होईल. सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये प्रदीर्घ काळ लिव्ह-इन मध्ये राहणाऱ्या जोडप्यांना विवाहासारखेच अधिकार देण्याचे निर्देश दिले आहेत, ज्याचा आधार या निर्णयामागे असू शकतो.जनगणना २०२७ ची वैशिष्ट्येही जनगणना डिजिटल स्वरूपाची असणार आहे, ज्यामध्ये नागरिक स्वतःची माहिती ऑनलाइन अपडेट करू शकतील. लिव्ह-इन जोडप्यांच्या या नवीन समावेशामुळे जनगणनेचा अर्ज देखील बदलला जाण्याची शक्यता आहे.

# नरहरी झिरवळ व्हिडिओ प्रकरणात पहिली कारवाई

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याचे मंत्री नरहरी झिरवळ एका नवीन वादात सापडले आहेत. त्यांचा एक कथित व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाने आता कायदेशीर वळण घेतले असून, मुंबईतील कफ परेड पोलीस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका ट्रान्सजेंडर व्यक्तीने याप्रकरणी पोलिसांत धाव घेऊन तक्रार नोंदवली आहे. या तक्रारीची दखल घेत कफ परेड पोलिसांनी संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रान्सजेंडरच्या भावविरोधातच कफ परेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



करण्यात आलेला आहे. संबंधित ट्रान्सजेंडर व्यक्तीने नरहरी झिरवळ यांच्याकडे अन्न व औषध प्रशासनात नोकरी लावून देण्याची मागणी केली होती. ही मागणी पूर्ण न झाल्यास त्यांचा कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली होती, असा गंभीर आरोप एफआयआरमध्ये करण्यात आला आहे. हा व्हिडिओ मूळ स्वरूपात नसून तो जाणीवपूर्वक ’एडिट’ करून किंवा त्यात तांत्रिक बदल करून पसरवण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. कफ परेड पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून भारतीय न्याय संहितेच्या (इछड) कलम ७९ नुसार कोणाच्याही खाजगी आयुष्यात डोकावून त्यांच्या गोपनीयतेचा भंग करणे आणि विनयभंग करणे, तसेच कलम ३५१(१) अंतर्गत गुन्हेगारी स्वरूपाची धमकी दिल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. यासोबतच, डिजिटल माध्यमांचा चुकीच्या पद्धतीने वापर करून बदनामीकारक मजकूर आणि छेडछाड केलेले व्हिडिओ पसरवल्याबद्दल माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमांचाही समावेश करण्यात आला आहे. तपासाअंती यातील दोषींवर कडक कारवाई होण्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

# १२ लाखांपर्यंत करमुक्ती!

## आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये नक्की कोणती करप्रणाली निवडावी?

भारतामध्ये करप्रणालीची निवड हा आज प्रत्येक करदात्यासमोर उभा राहणारा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. सरकारने कर रचना सोपी करण्याच्या दृष्टीने काही वर्षांपूर्वी नवीन करप्रणाली लागू केली आणि ती आता पूर्वनिश्चित करप्रणाली म्हणून कार्यान्वित आहे. मात्र, जुनी करप्रणाली उपलब्ध असल्याने करदात्यांना दोन्हींपैकी कोणती निवडावी, हा गोंधळ कायम आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ (मूल्यांकन वर्ष २०२६-२७) साठी योग्य निर्णय घेण्यासाठी खालील मुद्दे महत्त्वाचे आहेत.




नवीन करप्रणाली -: १२ लाखांपर्यंत करमुक्ती, कमी करदर आणि सोपी प्रक्रिया आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून सरकारने नवीन करप्रणालीत महत्त्वाचा बदल केला आहे. या बदलानुसार १२ लाख रुपयांपर्यंतचे एकूण करपात्र उत्पन्न पूर्णपणे करमुक्त राहणार आहे. त्यामुळे पगारदार, लघुउद्योजक आणि सेवा व्यवसाय करणाऱ्या नागरिकांसाठी हा निर्णय मोठा दिलासा देणारा ठरतो.

नवीन करप्रणालीची रचना अत्यंत सरळ, स्पष्ट आणि कागदपत्रविरहित आहे. पूर्वीप्रमाणे HRA, LTA, 80C, 80D, घरकर्जावरील व्याज अशा विविध वजावट दाखवण्याची गरज नाही. गुंतवणुकीवर आधारित करसवलती कमी झाल्या असल्या तरी, त्याबदल्यात कमी करदर आणि साधे करगणित हे दोन मोठे फायदे मिळतात. करदात्याने फक्त आपले एकूण उत्पन्न मोजायचे आणि त्यानुसार करदर लागू करायचा एवढेच. सरकारचा उद्देश हा करप्रणाली अधिक पारदर्शक करणे हा आहे. वजावट नसल्याने अनावश्यक कागदपत्रांची मागणी राहत नाही आणि करयोग्य उत्पन्नाचे गणित स्पष्ट होते. त्यामुळे नियमित गुंतवणुकीची सवय नसलेले, फ्रीलान्सर, व्यावसायिक किंवा वजावट घेण्याची संधी कमी असणारे करदाते नवीन करप्रणालीत अधिक लाभात राहतात. पारंपरिक जुनी करप्रणाली मात्र अजूनही उपलब्ध आहे. पण ती अवलंबण्यासाठी अनेक सवलती दाखवाव्या लागतात आणि करदर तुलनेने जास्त असतात. त्यामुळे करदात्यांनी आपली बचत पद्धत, गुंतवणूक, पगाराची रचना आणि उपलब्ध वजावट यांचा नीट विचार करूनच योग्य करप्रणाली निवडणे आवश्यक आहे.

एकूणच, १२ लाखांपर्यंत करमुक्ती, कमी करदर आणि सोपी प्रक्रिया या तीन प्रमुख कारणांमुळे नवीन करप्रणाली मध्यमवर्गासाठी आकर्षक ठरत आहे. त्यामुळे कररचनेतील साधेपणामुळे करबचतीकडे पाहण्याची नागरिकांची दृष्टी नव्या पद्धतीने घडू लागेल आणि करप्रणालीचा स्वीकार अधिक स्पष्ट, सोपा व व्यवहार्य होईल.

जुनी करप्रणाली -: सवलतींचे जग, पण गणित अधिक गुंतागुंतीचे जुनी करप्रणाली आजही अनेक करदात्यांची पहिली पसंती ठरते, कारण या पद्धतीत विविध करसवलती आणि वजावट मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. योग्य नियोजन करून या वजावटींचा वापर केल्यास करदात्याला प्रत्यक्षात लागणारा कर लक्षणीयरीत्या कमी होता येतो.

**जुनी करप्रणालीतील प्रमुख वजावट पुढीलप्रमाणे -:**

80C -: १,५०,००० पर्यंत गुंतवणूक वजावट

80D -: आरोग्य विम्यावर वजावट

HRA -: घरभाडे करसवलत

गृहकर्जावरील व्याज -: २,००,००० पर्यंत वजावट

LTA, Standard Deduction इत्यादी

या वजावटींचा योग्य वापर केल्यास करपात्र उत्पन्न मोठ्या प्रमाणात कमी होते. त्यामुळे या प्रणालीतील करदर जास्त असले तरी, वजावटांची संख्या आणि त्यांचा परिणाम लक्षात घेता अनेक करदात्यांसाठी जुनी करप्रणाली अद्यापही अधिक फायदेशीर ठरते.

एकंदरीत ज्यांच्याकडे गुंतवणूक जास्त आहे, HRA मिळते, गृहकर्ज आहे, किंवा अनेक वजावटी घेण्याची संधी आहे अशा करदात्यांकरिता जुनी करप्रणाली आजही प्रभावी पर्याय राहतो. मात्र, तिची रचना तुलनेने जटिल असल्यामुळे गणित अधिक तपशीलवार आणि कागदपत्रे अधिक लागतात

निष्कर्ष -:

करप्रणालीची निवड एकाच सूत्राने होत नाही. प्रत्येक करदात्याचे उत्पन्न, गुंतवणूक, वजावट घेण्याची क्षमता आणि पगाराची रचना वेगळी असते. त्यामुळे जर तुमच्याकडे जास्त वजावट घेण्याची क्षमता नसेल, किंवा उत्पन्न १२ लाखांच्या आसपास अथवा त्याखाली असेल, तर नवीन करप्रणाली अधिक फायदेशीर. जर तुम्हाला 80C, 80D, HRA, गृहकर्जावरील व्याज इत्यादी मोठ्या प्रमाणात वजावट मिळत असतील, तर जुनी करप्रणाली करबचतीच्या दृष्टीने चांगली.

आर्थिक सल्लागार म्हणून माझा सल्ला:

दरवर्षी आपल्या उत्पन्नाच्या रचनेचा, उपलब्ध वजावटांचा आणि गुंतवणुकीच्या स्वरूपाचा पुनरावलोकन करून नवीन व जुन्या करप्रणालीची अचूक तुलना करावी. आपल्या परिस्थितीस सर्वाधिक अनुरूप असलेली करप्रणाली निवडल्यास अनावश्यक करभार टाळता येतो आणि वर्षाच्या शेवटी जास्तीत जास्त करबचत साध्य होते.



**सीए. अमोल अशोक नगरकर**
**सनदी लेखापाल**
**(कर आणि आर्थिक सल्लागार), संगमनेर**
















# जनतेच्या हितासाठी आमचा संघर्ष कायम -आ. खताळ

## तळेवाडी आणि सारोळे पठार येथील सप्ताहला भेट



**संगमनेर तालुक्याच्या पठारा भागातील पोखरी बाळेश्वर गावांतर्गत येत असणाऱ्या तळेवाडी येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र यावर्षी परिसरात तीव्र पाणी टंचाई जाणवत असल्याने भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन आ.अमोल खताळ यांनी पुढाकार घेत दोन दिवसांसाठी पिण्याच्या पाण्याचा टँकर उपलब्ध करून दिला. या मदतीमुळे सप्ताहासाठी आलेल्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संघर्ष हा माझ्यासाठी नवीन नाही. संघर्षातूनच मी पुढे आलो आहे आणि यापुढेही जनतेच्या हितासाठी माझा संघर्ष कायम राहणार आहे. हा भाग अकोले मतदारसंघात असला तरी अकोले-संगमनेर असा भेदभाव मनातून काढून टाका. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी सदैव तत्पर राहील असा विश्वास आ. अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील पोखरीबाळेश्वर गावा अंतर्गत असलेल्या तळेवाडी गावाला तसेच सारोळे पठार येथील अखंड हरिनाम सप्ताहास आ. अमोल खताळ यांनी भेट दिली. या प्रसंगी ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना आमदार खताळ बोलत होते. यावेळी भाजप अभियंता सेलचे जिल्हाध्यक्ष हरिश्चंद्र चकोर, भाजप युवामोर्चाचे शैलेश फटांगरे, सुधीर पोखरकर, प्रशांत फटांगरे, तळेवाडीचे भाऊसाहेब काळे, किसन घोगरे, अजित काळे, गणेश गफले यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, या भागातील वन जमिनींचा प्रश्न हा दीर्घकालीन असून यासाठी आपण सातत्याने पाठपुराव करत आहोत. आपल्याकडे कोणती ही संस्था नसली तरी उपलब्ध साधन सामग्री च्या माध्यमातून शक्य तेवढी मदत करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. गावातील मंदिरासाठीही आवश्यक ती मदत केली जाईल. विधानसभा निवडणुकीत अनेक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी साथ दिल्याचा उल्लेख करत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. जनतेने दिलेल्या पाठिंब्यामुळेच विकासकामांना गती देणे शक्य झाले आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजनामधून सारोळे पठार फाटा ते गाव या रस्त्यासाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून या रस्त्याचे काम लवकरात सुरू होणार आहे. या रस्त्यामुळे परिसरातील वाहतूक सुलभ होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील पोखरी गावांतर्गत असणाऱ्या तळेवाडी येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत जलजीवन मिशनचे काम बंद असल्याची तक्रार गावातील भाऊसाहेब काळे यांनी आ. खताळ यांच्याकडे केली. त्यानंतर आ. खताळ यांनी जलजीवन मिशन योजनेतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी जलजीवन विभागाचे अधिकारी पुढील आठ दिवसांमध्ये तळेवाडीत भेट देतील असे सांगितले.

# कृषी शास्त्रज्ञ डॉ अशोकराव ढगे यांना कृषी आयकॉन्स अवॉर्ड



राहूरी
(युवावार्ता प्रतिनिधी)-

कृषी क्षेत्रात: शेती सेवा हा धर्म: समजून त्यांनी शेतकऱ्यांच्या साठी सुमारे ४०० लेख, १५ पुस्तके, आकाशवाणी हॅलो बळीराजा मध्ये २३ कार्यक्रम दूरदर्शनवर विविध कृषी तंत्रज्ञानाचे कार्यक्रम तसेच अनेक मिळावे घेऊन मार्गदर्शन केले आहे. डॉक्टर अशोकराव ढगे यांनी प्राध्यापक प्राचार्य व कुलगुरू तसेच मृदशास्त्रज्ञ पदावर कार्यभार सांभाळा आहे. सेवानिवृत्तीनंतर शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव मिळावा यासाठी आंदोलने व तुरुंगवास भोगला आहे कृषी क्षेत्रातील डॉक्टर ढगे यांचे संशोधन शिक्षण व विस्तार चौफेर कार्य झाले असल्यामुळे या कृषी पुत्राचा गौरव कृषी आयकॉन्स अवॉर्ड या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे दैनिक सार्वमत मार्फत सदरचा उपक्रम राबविला जात आहे. डॉक्टर ढगे म्हणाले की सुरुवातीच्या काळात प्रथम माझे कृषी लेख दैनिक सार्वमत मध्ये प्रसिद्ध झाल्यामुळे हुरूप मिळाला डॉक्टर ढगे यांनी तीन कृषी महाविद्यालय स्थापन करण्यासाठी अहवाल तयार करण्यात सहयोग नोंदवला. शेतीसाठी पाणी हा प्रश्न महत्त्वाचा असल्यामुळे घाटमाथ्यावरील पाणी गोदावरी खोऱ्यात नदीजोड प्रकल्पाद्वारे वळवावे यासाठी मुंबई येथे आंदोलन करून अटक व सुटका भोगली आहे डॉक्टर ढगे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल विविध क्षेत्रातील नामवंतांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्या यासाठी त्यांनी शेतकरी संरक्षण कायदा यामध्ये जोखीम व्यवस्थापन यासाठी प्राप्त स्थितीत प्रयत्न करत असल्याचे सांगितले


### संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डॉ. प्राची दिपक वायकर, रा. जनतानगर, पश्चिम भाग, गल्ली नं. ०७, म्यु.घ.नं. -, सि. स. नं. -११२/६९, स. नं. या ठिकाणी मध्ये डे केअर नर्सिंग होम (पहिला मजला) चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २३/०३/२०२६ **मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**


# अँग्लो उर्दू हायस्कूलमध्ये सय्यद मुश्ताक फखरे आलम यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात



()-

अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज विद्यालयातील बहुगुणी शिक्षक श्री. सय्यद मुश्ताक फखरे आलम यांचा सेवापूर्ती सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षपद अंजुमन इस्लाम ट्रस्ट या संस्थेचे अध्यक्ष श्री. अब्दुल्ला हाजी हसन हे होते.

सदर सेवापूर्ती सोहळ्याच्या कार्यक्रमात श्री. सय्यद मुश्ताक फखरे आलम यांच्या दीर्घ सेवेविषयी साजिद सर यांनी सांगितले की, एक बहुआयामी व अष्टपैलू शिक्षक सेवा निवृत्त होत आहे, त्यांची कमतरता नक्कीच भासेल, अशा शब्दांत त्यांना निरोप दिला. तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. अब्दुल्ला हाजी हसन चौधरी यांनीही श्री. सय्यद मुश्ताक फखरे आलम यांचे तोंडभरून कौतुक केले, तसेच त्यांच्या भावी जीवनाविषयी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या तर्फे शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने त्यांना भेटवस्तू देऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमात अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन श्री. शेख गनी हाजीसेठ, अंजुमन इस्लाम ट्रस्ट या संस्थेचे सचिव हाजी पठाण शौकत खान मोहम्मद खान, शेख नजीर ताजमोहम्मद, हाजी शेख एजाज शमशोद्दीन, हाजी शेख फझलोद्दीन कासम सर, सय्यद लियाकत अली अब्बास अली, अभय खोजे सर, शेख युसुफ जैनोद्दीन, हाजी पठाण इब्राहिमखान अहमद खान, शेख मुसा प्यारमोहम्मद, शेख समद इस्माईल, सलीमभाई मिर्झा, तसेच सय्यद मुश्ताक फखरे आलम यांचा परिवार, नातेवाईक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संगीतातून आत्मविश्वासाचा सूर: संगमनेरमध्ये खास समर वर्कशॉप

## Rock Beats ची संगीत कार्यशाळा



()-

संगमनेर येथील Rock Beats Music Academy Studio तर्फे यंदाच्या उन्हाळ्यात Rock Roll Summer Workshop 2K26 या विशेष संगीत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांसाठी ही एक अनोखी आणि उपयुक्त संधी ठरणार आहे. १७ एप्रिल ते १ मे २०२६ या कालावधीत होणाऱ्या या कार्यशाळेत गिटार, कीबोर्ड आणि ड्रम्स या वाद्यांचे सखोल प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणामध्ये केवळ मूलभूत तंत्र शिकवले जाणार नाही, तर लाईव्ह परफॉर्मन्स टेक्निक्स, ताल-लय यांचे ज्ञान आणि संगीताच्या माध्यमातून स्वतःची अभिव्यक्ती कशी करावी यावरही विशेष भर दिला जाणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शालेय शिक्षण पुरेसे ठरत नाही, तर कलेचा स्पर्श मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. संगीत ही केवळ एक कला नसून ती मनाला शांतता देणारी, विचारांना दिशा देणारी आणि व्यक्तिमत्त्व घडवणारी शक्ती आहे. लहान वयातच संगीतासारखी कला आत्मसात केल्यास मुलांमध्ये एकाग्रता, सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि सकारात्मकता मोठ्या प्रमाणात वाढते. विशेषतः उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांकडे मोकळा वेळ असतो; हा वेळ मोबाईल किंवा टीव्हीमध्ये घालवण्यापेक्षा काहीतरी नवीन शिकण्यात घालवला, तर त्याचा त्यांच्या भविष्यासाठी निश्चितच मोठा फायदा होतो.

याच पार्श्वभूमीवर Rock Beats Academy ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी केवळ शिकण्याचीच नव्हे, तर अनुभव घेण्याची एक संधी घेऊन येत आहे. या कार्यशाळेत मार्गदर्शित प्रॅक्टिस सेशन्स, परफॉर्मन्स-आधारित शिक्षण आणि स्टेजवर आत्मविश्वासाने उभे राहण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. मुलांना स्वतःच्या भीतीवर मात करून प्रेक्षकांसमोर सादरीकरण करण्याची कला शिकवली जाणार आहे, जे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

कार्यशाळेचा समारोप ग्रँड फिनालेने होणार असून, यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. या वेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी आणि सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता आणि प्रेरणा निर्माण होणार आहे.

या कार्यशाळेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यमान विद्यार्थ्यांसाठी विशेष फी सवलत तसेच मित्रांना रेफर केल्यास अतिरिक्त लाभ देण्यात येणार आहेत. केवळ ३०००/- इतक्या माफक शुल्कात उपलब्ध असलेली ही कार्यशाळा मुलांच्या कलागुणांना योग्य दिशा देणारी आणि त्यांचा आत्मविश्वास वाढविणारी ठरणार आहे.

उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांनी काहीतरी नवीन, उपयुक्त आणि आनंददायी शिकावे, त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक सक्षम व्हावे, या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ६२६२ ९८ १३१३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# 'कॅमेऱ्यामागची ती ': महिला फोटोग्राफर्सच्या प्रेरक यशोगाथा




युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - 'कॅमेऱ्यामागची ती' या पुस्तकात लेखक प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांनी महाराष्ट्र आणि देशातील ४० महिला फोटोग्राफर्स यांच्या यशोगाथा शब्दांकित केल्या आहेत. पुस्तकात अहिल्यानागर येथील फोटोग्राफर प्रियांका सातपुते यांचीही यश कथा समाविष्ट आहे. सातपुते यांनी आपल्या फोटोग्राफीच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्न आणि विषय हाताळले आहेत.

कोल्हापूर येथील भाग्यश्री प्रकाशन यानी पुस्तक प्रकाशित केले आहे. डॉ. घोडेस्वार यांनी या आधीही विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवलेल्या स्त्रियांच्या योगदानावर प्रकाशझोत टाकणारी पुस्तके लिहिली आहेत.

'कॅमेरामन हा शब्द लिंगभेद करणारा आहे. त्या ऐवजी कॅमेरापर्सन हा शब्द उचित आहे. फोटोग्राफर म्हटला की आपल्या डोळ्यासमोर प्रामुख्याने पुरुषाची छबी उभी राहते. मात्र या क्षेत्रात होमी व्यारावाला यांच्यापासून आजच्या अनेक महिला फोटोग्राफर्स यांनी भरीव अशी कामगिरी केली आहे आणि करीत आहेत. त्यांच्या कार्याचा, त्यांनी केलेल्या संघर्षाचा परिचय वाचकांस करून देण्याच्या उद्देशाने हे पुस्तक लिहिले असल्याचे डॉ. घोडेस्वार यांनी विशद केले. जेणेकरून नवीन मुलींना या क्षेत्रात येण्याची प्रेरणा मिळेल. शिवाय स्त्रीच्या नजरेतून व्यक्त होणारी फोटोग्राफी लोकांसमोर आणणे हा ही हेतू आहे.

# सी-६० च्या शौर्याला सलाम

## राज्य सरकारकडून विशेष पदक जाहीर



मुंबई (वृत्तसंस्था)

माओवादाविरोधातील लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळविले आहे. आता माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली आहे. त्यामुळे किमान तीन वर्षे सी-६० मध्ये सेवा बजावणाऱ्या जवानांना राज्य शासनामार्फत विशेष 'सी-६० पदक' देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद झाली. या परिषदेस गृह राज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर, गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते तसेच भारतीय पोलिस प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

गडचिरोलीसारख्या भागात आता विकासाचे नवे चित्र उभे राहत असून लोकशाहीची मुळे बळकट होत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली असून आता तिच्या पुनरुज्जीवनाला आळा घालणे हे पुढील मोठे आव्हान आहे. या संघर्षात २४४ पोलीस कर्मचारी शहीद झाले, तर ६०९ नागरिकांनी प्राण गमावले आहे.मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस यंत्रणेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देत, गुन्हे अन्वेषण आणि न्यायप्रक्रियेत 'एंड टू एंड' डिजिटायझेशन आवश्यक असल्याचे सांगितले. विविध अन्वेषण आणि क्राईम मॉडेल्सचा समन्वय साधून संपूर्ण क्रिमिनल जस्टिस सिस्टीम डिजिटल करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. डिटेक्शनपासून एव्हिडन्स संकलन, चार्जशीट दाखल करणे यांसह सर्व प्रक्रिया शंभर टक्के डिजिटल झाल्यास पुराव्यांची अचूकता आणि साखळी अधिक मजबूत होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, नवी मुंबईत राबविण्यात आलेल्या ब्लॉकचेन-आधारित एव्हिडन्स मॅनेजमेंट सिस्टीमप्रमाणे प्रणाली राज्यभर लागू केल्यास पुराव्यातील छेडछाड रोखता येईल, असे सांगून पुढील सहा महिन्यांत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये ही प्रणाली लागू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. दोषारोप सिद्ध होण्याचे प्रमाण (कन्व्हिक्शन रेट) वाढवण्यास अपयशी ठरलेल्या प्रकरणांचे विश्लेषण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'सीआयडी'ला दिले. राज्यातील गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषारोप दर वाढवण्यासाठी ठोस कार्यपद्धती (एसओपी) आणि स्पष्ट रोडमॅप तयार करावा असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## संपादकीय...

# चीन विषयक भारताचे धोरण

## संतुलीत परस्परावलंबीत्वाचा मार्ग

भारताचे चीनविषयक धोरण हे केवळ आर्थिक सहकार्य किंवा लष्करी संघर्ष या दोन टोकांच्या पर्यायांमध्ये अडकलेले नसून ते नियंत्रित आणि संतुलित परस्परावलंबित्वावर आधारित एक सुबुद्ध आणि व्यावहारिक धोरण म्हणून विकसित होत आहे. जून २०२० मधील गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर भारत-चीन संबंधांमध्ये राजकीय विश्वास कमी झाला आणि सुरक्षा परिस्थिती अधिक तणावपूर्ण झाली, तरीही एक मूलभूत वास्तव बदलले नाही, ते म्हणजे भारताची आर्थिक वाढ ही प्रादेशिक आणि जागतिक उत्पादन साखळ्यांशी घट्ट जोडलेली आहे आणि त्या साखळीत चीनची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या पार्श्वभूमीवर भारताने एक संतुलित दृष्टिकोन स्वीकारला आहे, ज्यामध्ये कोणत्याही एकाच देशावर अति अवलंबित्व टाळण्याचा प्रयत्न आहे, कारण संकटकाळात हेच अवलंबित्व दबावाचे साधन ठरू शकते, पण त्याच वेळी पूर्णपणे संबंध तोडल्यास देशांतर्गत उत्पादन, खर्च आणि रोजगारावर विपरीत परिणाम होऊ शकतो, ही जाणीवही स्पष्टपणे ठेवली गेली आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारत-चीन द्विपक्षीय व्यापार सुमारे १२७.७ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचला असून त्यात आयात सुमारे ११३.५ अब्ज डॉलर आणि निर्यात केवळ १४.३ अब्ज डॉलर इतकी राहिली, त्यामुळे सुमारे ९९.२ अब्ज डॉलरची व्यापार तूट निर्माण झाली आहे, जी केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून इलेक्ट्रॉनिक्स, यंत्रसामग्री, रसायने, अक्षय ऊर्जा आणि औषधनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांमध्ये चीनवर असलेले अवलंबित्व अधोरेखित करते. मात्र या तुटीकडे केवळ राजकीय दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी ती धोरणात्मक विश्लेषणासाठी एक महत्त्वाचे साधन म्हणून वापरणे अधिक आवश्यक ठरते, कारण जागतिक उत्पादन साखळ्यांच्या युगात द्विपक्षीय संतुलन हे आर्थिक ताकदीचे संपूर्ण चित्र दाखवत नाही, तर देशाची एकूण बाह्य आर्थिक स्थिती अधिक महत्त्वाची असते, आणि भारताची चालू खाते तूट ही सकल देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे ०.६ टक्के इतकी मर्यादित असल्याने व्यापक आर्थिक स्थैर्य टिकून आहे. तरीही विशिष्ट घटकांवरील जास्त अवलंबित्व ही भू-आर्थिक जोखीम निर्माण करू शकते, कारण उत्पादन साखळीच्या वरच्या स्तरावर केंद्रीकरण असल्यास परवाना प्रक्रियेत विलंब, कागदपत्रांमधील अडथळे किंवा निवडक निर्यात निर्बंध यांसारख्या लहान वाटणाऱ्या गोष्टीही मोठे आर्थिक अडथळे निर्माण करू शकतात. त्यामुळे भारताचा भर आता केवळ व्यापार तूट कमी करण्यावर नसून विशिष्ट क्षेत्रांतील असुरक्षितता ओळखून ती कमी करण्यावर आहे. यासाठी उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना हे एक महत्त्वाचे साधन ठरले असून त्याद्वारे देशांतर्गत उत्पादन, पुरवठा साखळी आणि मूल्यवर्धन वाढवण्याचा प्रयत्न होत आहे, ज्यामुळे मार्च २०२५ पर्यंत सुमारे २०.०९ अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक आकर्षित करण्यात यश आले आहे. यासोबतच भारताने मानके, तांत्रिक नियम, अनुरूपता अटी, अँटी डम्पिंग शुल्क, प्रतिपूरक उपाय आणि संरक्षणात्मक उपाय यांसारख्या नियमाधारित साधनांचा वापर वाढवून आयात नियंत्रण आणि देशांतर्गत उद्योग संरक्षण यामध्ये संतुलन साधण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने सीमेलगतच्या देशांतील गुंतवणुकीवर नियंत्रण, खरेदीतील प्राधान्य धोरण, दूरसंचार क्षेत्रातील विश्वासार्ह स्रोत तत्त्वे आणि डेटा आधारित प्लॅटफॉर्म्सवरील कडक तपासणी यांसारख्या उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. २०२० नंतरच्या काळात काही क्षेत्रांमध्ये जलद प्रगती झाली असली तरी उत्पादन क्षेत्रात अजूनही वरच्या स्तरावरील अवलंबित्व कायम आहे, हे वास्तव स्वीकारावे लागते. त्यामुळे मुख्य आव्हान म्हणजे अशा महत्त्वाच्या घटकांमध्ये विविधीकरण करणे आणि पर्याय निर्माण करणे, जे अल्पावधीत कठीण असले तरी दीर्घकालीन दृष्टीने आवश्यक आहे. जोखीम कमी करण्याच्या प्रक्रियेमुळे सुरुवातीला खर्च वाढतो, नियमांचे पालन करावे लागते आणि पुरवठादारांचे पर्याय मर्यादित होतात, परंतु दीर्घकाळात यामुळे आर्थिक लवचिकता आणि स्वायत्तता वाढते. विशेषतः स्वच्छ ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स आणि प्रगत उत्पादन यांसारख्या क्षेत्रांमध्ये भारत विस्तार करत असताना महत्त्वाच्या खनिज आणि प्रक्रियायुक्त घटकांवरील अवलंबित्व ही मोठी जोखीम ठरू शकते. त्यामुळे भारताने दोन स्तरांवर रणनीती आखली आहे, एक म्हणजे देशांतर्गत क्षमता वाढवणे आणि दुसरे म्हणजे बाह्य भागीदारीद्वारे विविधीकरण करणे, कारण पूर्ण आत्मनिर्भरता ही व्यवहार्य उद्दिष्ट नसून लवचिकता वाढवणे हा खरा हेतू आहे.


CorelDRAW
Ps Ai Id
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005


# शब्बीर अहमद अन्सारी यांना संगमनेरात शोकसभेत आदरांजली



संगमनेर ()-

ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांना खिराज-ए-अकीदत अर्पण करण्यासाठी आणि आदरांजली वाहण्यासाठी येथे पॅव्हेलियन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले.

या सभेचे अध्यक्षस्थानी संगमनेरचे माजी उपनगराध्यक्ष शफी तांबोळी हे होते. तर अँग्लो उर्दू हायस्कूलचे मुख्य विश्वस्त अब्दुला चौधरी यांनी आपल्या भाषणात शब्बीर अहमद अन्सारी यांच्या जीवनकार्यावर आणि सामाजिक योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला. या शोकसभेत पॅव्हेलियन इंग्लिश मीडियम स्कूलचे सर्वेसर्वा व प्राचार्य रज्जाक शेख, डॉ. जी.पी. शेख, ड. संग्राम जोंधळे, ड. शरीफ पठाण आदींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी आसिफ अली सय्यद, मो. इदरीस शेख, शानू बेगमपुरे, आसिफ शेख तसेच सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होते. या प्रसंगी संगमनेर शहरातील एखाद्या चौकाला किंवा रस्त्याला शब्बीर अहमद अन्सारी यांचे नाव देण्यात यावे, अशी सर्वांनी एकमुखी मागणी केली.

# मांडवे बुद्रुक येथे एकादशी निमित्त प्रवचन-कीर्तनाची सुंदर परंपरा



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथे हरिभक्त परायण संत घुले बाबा यांच्या कृपाशीर्वादाने आणि बबन शेख यांच्या संकल्पनेतून दर महिन्याच्या पहिल्या एकादशीला प्रवचन व कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे.

प्रा. रामदास धुळगंड व दत्तात्रय धोंगडे गुरु यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांच्या सहकार्याने ही उपक्रमशील परंपरा सुरू असून, वारकरी संप्रदायासाठी आनंदाची बाब ठरत आहे.

यावेळी हरिभक्त परायण भीमराज महाराज उगलमुगले यांचे प्रवचन पार पडले. कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वक्ता सेलच्या महाराष्ट्र उपाध्यक्ष अमृता अनिल कोळपकर यांचे सौजन्य लाभले.

उगलमुगले महाराजांचा सत्कार सामाजिक कार्यकर्ते अनिल कोळपकर यांच्या हस्ते करण्यात आला.

या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, महाप्रसादासाठी महिनाभर आधीच नोंदणी होते. झिटे व ढेंबरे कुटुंबीयांनी पंगतीचे आयोजन केले. भक्तिमय वातावरणात ही परंपरा कायम ठेवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# राज्यस्तरीय रिंग टेनिस स्पर्धेत मालपाणी विद्यालय उपविजेते



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम तसेच वाशिम जिल्हा टेनिक्काईट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय टेनिक्काईट स्पर्धेत मा. रु. दा. मालपाणी विद्यालय यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धेत पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करताना १४ वर्षे मुलांच्या संघाने अमरावती विभागासोबत अटीतटीच्या झुंजीत द्वितीय क्रमांक पटकावत उपविजेतेपद मिळविले. तसेच १४ वर्षे मुलींच्या संघाने कोल्हापूर विभागाविरुद्ध उत्कृष्ट खेळ करत तृतीय क्रमांक प्राप्त केला. याशिवाय १७ वर्षे मुलांच्या संघानेही अमरावती विभागासोबत अटीतटीची झुंज देत तृतीय क्रमांक पटकावला. या सर्व यशस्वी खेळाडूंना पर्यवेक्षिका, क्रीडा शिक्षिका रंजना पवार व अमोल सस्कर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व खेळाडू, मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर स्पर्धा दि. २७, २८ व २९ मार्च रोजी जिल्हा क्रीडा संकुल, वाशिम येथे संपन्न झाली. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील सर्व विभाग स्तरावरील संघ सहभागी झाले होते.


रजि नं ए. एन. आर. आर. एस. आर./सी.आर./२८९७/२००० दिनांक २५/१०/२०००

मराठा सेवा संघ प्रणित

**अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर**

**मुख्य कार्यालय–**'मराठा सांस्कृतिक भवन' बारातोटीकारंजा, केवळ हॉस्पिटलसमोर, जिजाउ मार्ग, अ.नगर. फोन नं.२३५४९०७

**संगमनेर शाखा–** डॉ. शेवाळे कॉम्प्लेक्स, सावतामाळी नगर, नविन अकोले रोड, संगमनेर फोन नं २२०७९१, ९५१८७५६८४०

**अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सह. पतसंस्था मर्या., अहिल्यानगर शाखा संगमनेर**

**टेंडर नोटिस**

संस्थेच्या संगमनेर शाखेत खालील काम करावयाचे आहे. मान्यप्राप्त माल पुरवठा करणाऱ्या व काम पुर्ण करून देणाऱ्या ठेकेदारांकडून मालाचे व मजूरीचे कोटेशन मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मालाचे नाव | एकुण काम अंदाजे | प्रति स्क्वे.फुट मटेरियल दर | मजुरीचा दर |
|---|---|---|---|---|
| १ | ॲल्युमिनियम पार्टिशन | १००० स्क्वे. फुट | | |
| २ | सिलींग वर्क पी.व्ही.सी. सिट | ७५० स्क्वे. फुट | | |
| ३ | लाईट फिटींग प्रति पॉईंट मटेरियल<br>१. साधा पॉईंट २. लाईट पॉईंट<br>३. अर्धा पॉईंट ४. सर्कीट पॉईंट<br>५. ट्यूब ६. फॅन | | | |

तरी कंपनीचे नावासहीत सिलबंद पाकीटात जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत शाखा कार्यालय संगमनेर येथे जमा करावेत. उशीरा आलेले कोटेशन विचारात घेतले जाणार नाही.

स्थळ : संगमनेर

दिनांक: ३०/०३/२०२६

**शाखाधिकारी**
**अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सह. पतसंस्था मर्या., अहिल्यानगर शाखा संगमनेर**
**मो.नं. ९५१८७५६८४०**



**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

We treat He cure's

**डॉ. प्रविणकुमार पानसरे** मो. ९८२२३९७५७४

**डॉ. दिपाली पानसरे** मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

**पाहिजेत**

अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची



**ग्रामपंचायत केळुंगण, ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

जाहीर निविदा अंतर्गत खुली निविदा सुचना क्र. ०१ /२०२६ -२०२७

ग्रामपंचायत ग्रामपंचायत केळुंगण ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे मार्फत योग्य त्या जिल्हा परिषद ठेकेदार अंतर्गत नोंदणीकृत मक्तेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या निविदा / दरपत्रक मागवीत आहेत. निविदेचा कोरा नमुना व भरलेली निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि. ०१/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजले पासून ते दि. ०९/०४/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शासकिय सुट्टी वगळून व कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच दि.१० /०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा नंतर निविदा उघडण्यात येतील.

| अ.क्रं. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | साहित्य संख्या | बयाना रक्कम रुपये | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कोऱ्या निविदा संचाची किंमत | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग/ पुरवठा साहित्याचे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पाईप लाईन करणे (१५ वा वित्त आयोग सन २०२५-२६) | ३८२६८० | - | ३८२६ | ०३ महिने | २००/- | वर्ग ८ व पुढील |
| २. | पाण्याची टाकी बांधकाम करणे(१५ वा वित्त आयोग सन २०२५-२६) | २०३३८३ | - | २०३३ | ०३ महिने | २००/- | वर्ग ८ व पुढील |
| ३. | घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणे | २५४९२ | - | २५४ | ०३ महिने | २००/- | वर्ग ८ व पुढील |
| ४. | पेसा योजना साहित्य खरेदी करणे | १५०००० | - | ०० | ०३ महिने | १००/- | दरपत्रक |

अटी व शर्ती १) सदर काम पूर्ण करणेच कालावधी ३ महिने राहील २) निविदा/ दरपत्रक या तांत्रिक लिफाफा व्यापारी लिफाफा या दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. ३) निविदा / दरपत्रक अटि व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदा मधिल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीने ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत. ४) लिफाफाक्र १ शक्यतो निविदेमधील नमूद कालावधी व वेळेत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येईल. सदर निविदा उघडताना मक्तेदार उपस्थित नसले तरीही नियोजित वेळेत निविदा उघडण्यात येतील.

**ग्रामसेवक** ग्रामपंचायत केळुंगण, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

**सरपंच** ग्रामपंचायत केळुंगण, ता. अकोले, जि. अहिल्यानगर



**त्वरित पाहिजेत**

द्वारकादास शामकुमार

सेल्समन
कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर
सिक्युरीटी

कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९

9511238422



## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**वॉचमन पाहिजे**

बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे

राहण्याची सोय आहे

संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर

8378956909
8459199913

**बंगला भाड्याने पाहिजे**

2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे

- संपर्क -
9503626111
9272165050

**पाहिजेत**

सेल्समन - १ जागा

सर्विस प्रोव्हायडर हेल्पर ०१ जागा

अकाउंटंट - ०१ जागा

कामाचे ठिकाण : संगमनेर

M/s. Pawar and Sons
7498621873

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**

मुलगा/ पुरुष कर्मचारी

आकर्षक पगार

श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर

Biodata सह भेटणे

9822283079

**हेल्पर पाहिजे**

साईकृपा एंटरप्राईजेस

पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे

पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर

9767059977

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME KAUSARBI IBRAHIM SHAIKH

TO NEW NAME AS KAUSAR IBRAHIM SHAIKH

ADD – 787, NAIKWADPURA, NEAR JAMA MASJID, SANGAMNER, TAL -SANGAMNER DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME ADIL IBRAHIM SHAIKH

TO NEW NAME AS AADIL IBRAHIM SHAIKH

ADD – DONGARE MALA, RAHEMATNAGAR ,JORVE ROAD, SANGAMNER, TAL- SANGAMNER DIST- AHILYANAGAR

**दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९ ७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४**


वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी







MALPANI

卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐

**मालपाणी उद्योग समूह** आयोजित

**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

# संगमनेर महाविद्यालय प्राणीशास्त्र विभागातर्फे प्लेसमेंट ड्राइव्ह, १० विद्यार्थ्यांची निवड



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर महाविद्यालय येथील प्राणीशास्त्र विभागातर्फे एन्झीरिच बायोटेक सोल्यूशन्स प्रायवेट लिमिटेड यांच्या सहकार्याने प्लेसमेंट ड्राइव्हचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच उद्योग-शैक्षणिक दुवा मजबूत करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न करण्यात आला.

या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये सुमारे २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी प्राणीशास्त्र विभागातील ७ आणि वाणिज्य विभागातील ३, अशा एकूण १० विद्यार्थ्यांची ज्युनियर मॅनेजमेंट ट्रेनी पदासाठी निवड करण्यात आली. निवड प्रक्रियेत गट चर्चा आणि वैयक्तिक मुलाखतींचा समावेश होता. या प्रसंगी प्राणीशास्त्र विभाग आणि एन्झीरिच बायोटेक सोल्यूशन्स प्रा. लि. यांच्यामध्ये विद्यार्थ्यांना ऑन-जॉब ट्रेनिंग व प्लेसमेंटसाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला. या करारामुळे विद्यार्थ्यांना उद्योगाधारित प्रशिक्षण आणि रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होणार आहेत.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत ऑफर लेटर्स प्रदान करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य प्रो. डॉ. रवींद्र तासीलदार, उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रवीण त्र्यंबके, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. वंदना भवरे, प्रो. डॉ. सीमा बोरगावे तसेच इतर प्राध्यापक उपस्थित होते. सदर प्लेसमेंट ड्राइव्ह डॉ. माधवी डिग्रसकर आणि डॉ. अनिरुद्ध डिग्रसकर यांनी एन्झीरिच बायोटेक सोल्यूशन्स प्रा. लि. यांच्या वतीने यशस्वीरित्या पार पाडला. तसेच डॉ. श्रीहरी पिंगळे यांनी हा प्लेसमेंट ड्राइव्ह यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न घेतले.

शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सचिव डॉ. अनिल राठी, जनरल सेक्रेटरी सी ए नारायण कलंत्री, खजिनदार श्री राजकुमार गांधी आणि व्यवस्थापन मंडळातील सर्व सदस्यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे तसेच आयोजकांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या आहेत. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरला असून, भविष्यातही अशा प्रकारचे उद्योगाभिमुख उपक्रम राबविण्यात येतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# पश्चिम घाटमाथ्याचे पाणी दुष्काळी गावांना द्या - शेतकरी संघटना



कोपरगाव (युवावार्ता प्रतिनिधी)-

गोदावरी खोरे हे पाण्याच्या बाबतीत तुटीचे खोरे असून, याबाबत सरकारने मराठवाड्यास पाणी देण्यास सुरुवातीला नव्वद हजार कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला असून, यात नगर जिल्ह्यातील दुष्काळी गावांचा साधा विचार केलेला नाही. त्यामुळे नगर-नाशिक जिल्ह्यातील वर्षानुवर्षे दुष्काळी असलेल्या, आणि निळवंडेत कमी पाणी असलेल्या, आणि भोजापूर धरणाच्या लाभक्षेत्रातील गावांना अग्रक्रमाने पाणी द्यावे, अशी महत्वपूर्ण मागणी आज निळवंडे कालवा कृती समिती आणि शेतकरी संघटनेने उर्ध्व प्रवरा-२ (निळवंडे) धरणाचे कार्यकारी अभियंता यांचेकडे एक निवेदन देऊन केली आहे. या मागणीचे दुष्काळी शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, शेतकरी संघटनेचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नानासाहेब जवरे व सचिव रूपेंद्र काले यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात (छत्रपती संभाजीनगर) दोन वर्षांपूर्वी केलेल्या जनहित याचिकेची (क्रं.-५/२०२४) मागील वर्षी सुनावणी झाली होती. यात न्या. मंगेश पाटील व न्या. प्रफुल्ल कुबाळकर यांनी राज्य सरकारला नोटीस बजावली होती. गोदावरी खोरे हे पाण्याच्या बाबतीत तुटीचे खोरे आहे. त्यातच पाण्यावरून नगर-नाशिक विरुद्ध वाद राज्याला सर्वश्रुत आहे.

पश्चिम वाहिनी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळवण्यासाठी प्राथमिक अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने २००१ व २०१९ रोजी समिती स्थापन केली होती. या समितीच्या अहवालानुसार कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हास नदी खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात प्रवाही वळण योजनांद्वारे, तसेच उपसा नदीजोड, वळण योजनांद्वारे एकूण ८९.९२ टी.एम.सी. पाणी वळविण्याबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे. यात प्रवरा खोऱ्यातील घाटघर जवळील हिवरा नाला तसेच साम्रद गावाजवळील साम्रद नाला येथे वळण बंधारे बांधून पश्चिमेकडे जाणारे पाणी पूर्वेकडे वळविण्याची योजना आहे. त्याला कालवा कृती समितीच्या मागण्यांनुसार महाआघाडीचे जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी गती दिली होती. त्यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण केला होता. या बंधाऱ्याद्वारे एकूण १२८७ दशलघफूट अतिरिक्त पाणी वळविणे शक्य होणार असून, त्याचा निळवंडे प्रकल्पासाठी फायदा होणार आहे. तर उर्ध्व प्रवरा खोऱ्यात एकूण १५ टी.एम.सी. पाणी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी निळवंडे कालवा कृती समिती व शेतकरी संघटना प्रयत्नशील आहे.

शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ड. अजित काळे यांचे विधी सहाय्याने पत्रकार नानासाहेब जवरे व रूपेंद्र काले यांच्या नावाने दोन वर्षांपूर्वी निळवंडे सारखी जनहित याचिका दाखल केली होती. शिवाय शेतकरी संघटना आणि गोदावरी खोऱ्यातील शेतकरी यांनी कोपरगाव येथे एकत्र येत या पाण्यासाठी संघर्ष समिती स्थापन केली आहे. त्याची सुनावणी मागील वर्षी दि. २८ जानेवारी २०२५ रोजी झाली होती. यात उच्च न्यायालयाचे न्या. मंगेश पाटील व न्या. प्रफुल्ल कुबाळकर यांच्यासमोर ही सुनावणी पार पडली होती. त्यावेळी उर्ध्व गोदावरी खोरे जल पुनर्स्थापना संघर्ष समिती नगर-नाशिकच्यावतीने ॲड. काळे यांनी युक्तिवाद केला, तर सरकारी पक्षाच्यावतीने अभियोक्ता सुरासे यांनी आपली बाजू मांडली. त्यावेळी उच्च न्यायालयाने राज्य सरकार, गोदावरी खोरे मराठवाडा विकास महामंडळास ही नोटीस बजावली होती.

शिवाय भोजापूर या १३.०२ द. ल. घ. मी. क्षमतेच्या छोट्या प्रकल्पातील जवळपास सिन्नर तालुक्यातील १२, तर संगमनेर तालुक्यातील ०७ गावे, असे एकूण १९ गावे उपेक्षित ठेवली आहेत. त्या गावांचे नाव घेण्यास उत्तर नगर जिल्ह्यातील कोणीही नेता तयार असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील माळवाडी, दूर्षिंगवाडी, दातली, दोडी, नांदुर शिंगोटे, खंबाळे, पांगरी, चास, भोकणी, सुरेगाव आदी १० गावे, तर संगमनेर तालुक्यातील चिंचोली गुरव, लोहारे, कासारे, पिंपळे, सोनेवाडी, पारेगाव, पोखरी, केलवड आदी ०७ गावांत मोठा असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे या गावांना कोणी वाली आहे की नाही, असा सवाल निर्माण झाला आहे. त्यामुळे आज शेतकरी संघटना आणि निळवंडे कालवा कृती समिती यांनी संयुक्तपणे आज निळवंडे धरणाचे कार्यकारी अभियंता प्रदीप हापसे, कालवा विभागाचे अभियंता अमोल कवडे यांची भेट देऊन त्यांना निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी पश्चिमेचे पाणी आधी या निळवंडे धरणाचे लाभक्षेत्रातील दुष्काळी १९० गावे व भोजापूर धरणाचे खालील १९ गावे, अशा २०९ तुषार्थ गावांना सदर पाणी आरक्षित करावे, अशी महत्वपूर्ण मागणी केली आहे.

# वारकऱ्यांवर आरटीओची कारवाई

## बजरंग दल आक्रमक



श्रीरामपूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

अयोध्या येथून दोन धाम यात्रा करून परतणाऱ्या वारकरी भाविकांच्या वाहनांवर बाभळेश्वर येथे श्रीरामपूर आरटीओ अधिकाऱ्यांनी कारवाई करत हजारो रुपयांचा दंड आकारल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे वारकरी भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, बजरंग दल आक्रमक झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वाहनांवर भगवा ध्वज लावणे व गाडीत बॅग ठेवण्याचे कारण देत आरटीओ अधिकाऱ्यांनी गाड्या सुमारे एक तास अडवून ठेवल्याचा आरोप भाविकांनी केला आहे. यामुळे प्रवासात मोठा विलंब झाला. भाविकांच्या म्हणण्यानुसार, गाडीत वयोवृद्ध महिला व पुरुष असल्याने त्यांना तातडीने पुढे जाऊ देण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, अधिकाऱ्यांनी उर्मट भाषेत उत्तर देत कारवाई सुरूच ठेवली. यानंतर दुसऱ्या वाहनावरही सुमारे १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

या घटनेनंतर हभप गागरे महाराज तसेच बजरंग दलचे जिल्हा सुरक्षा प्रमुख प्रसाद घोगरे यांच्या नेतृत्वाखाली संतप्त वारकरी श्रीरामपूर आरटीओ कार्यालयात दाखल झाले. संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तक्रार नोंदवून त्यांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी वारकरी व हिंदू संघटनांकडून करण्यात येत आहे.

# एप्रिल फूल : मस्करीचा दिवस, पण मर्यादेची जाणीव आवश्यक



मार्च महिना संपत आला, आणि आता एक एप्रिल जवळ आला आहे. अनेक लोकांना एप्रिल फुल करण्याच्या तयारीत आपण वेगवेगळ्या आयडिया शोधत असतो. या दिवशी एकमेकांना फुल बनवणे, म्हणजेच मूर्ख बनवणे, हे अपेक्षित असते. याच्यामागे मुद्दाम कोणाला त्रास व्हावा, हा उद्देश नसतो. याच्या वेगवेगळ्या कथा आहेत.

एप्रिल फुलचा इतिहास हा पुढील प्रमाणे आहे. इंग्लंडचा राजा रिचर्ड दुसरा आणि बोहेमियाची राणी एजनी यांनी त्यांच्या लग्नाची घोषणा केली होती. त्यांच्या एंगेजमेंटची तारीख ३२ मार्च ठेवण्यात आली होती. ही बातमी समजताच लोकांनी खूप आनंद उत्सव साजरा केला. परंतु, जेव्हा लोकांच्या लक्षात आले की कॅलेंडरमध्ये ३२ मार्च अशी कोणतीही तारीख नाही, त्यावेळी राजा आणि राणी यांनी आपली मस्करी केली आहे, आणि आपल्याला मूर्खात काढले आहे, असे लोकांच्या लक्षात आले. आता ३२ तारीख नसते, म्हणजे ती तारीख झाली एक एप्रिल. तेव्हापासून एप्रिल फुल हा साजरा करण्यास सुरुवात झाली, असे मानतात.

याशिवाय आणखी एक मान्यता आहे की, ही घटना १५८२ ची फ्रान्समधली आहे. त्यावेळी चार्ल्स पोपने फ्रान्स जुलियन कॅलेंडर बदलले, आणि त्याच्या जागी नवीन रोमन कॅलेंडर आणले. त्यानंतर फ्रान्सला नवीन वर्ष वसंत विषुववृत्तात साजरा करायचे होते, आणि तो दिवस एक एप्रिलचा होता. परंतु नागरिकांना ती योजना समजली नाही, आणि ते एक एप्रिलला नवीन वर्ष समजू लागले. तेव्हा फ्रान्सचे जवळपास सर्व नागरिक हे फुल, म्हणजे वेडे, ठरले होते. तेव्हापासून एक एप्रिल हा दिवस लोकांना फुल, म्हणजे गमतीमध्ये मूर्ख बनवण्यासाठी, साजरा केला जातो. काहींच्या मते ब्रिटिशांनी हा दिवस एकोणिसाव्या शतकात साजरा करायला सुरुवात केली. गेल्या काही दिवसांत सोशल मीडियावर सुद्धा एक एप्रिल हा दिवस फुल बनवण्यासाठी केला जातो. हा दिवस चेष्टा मस्करी करण्यात नक्कीच घालवा, परंतु कोणालाही दुखवू नका. त्याचा आनंद घ्या, ही अपेक्षा.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो.नं. ९८९०१६३६४२**

# श्रद्धेचा गैरवापर आणि माध्यमांचा अतिरेक

## खरात प्रकरणातून उलगडणारे वास्तव



अशोक खरात प्रकरणाने सध्या महाराष्ट्रात मोठी खळबळ उडवली आहे. स्वतःला अध्यात्मिक व्यक्तिमत्त्व म्हणून सादर करणाऱ्या या तथाकथित बाबाने अनेक सामान्य नागरिकांपासून ते काही राजकीय व प्रशासकीय वर्तुळांपर्यंत विश्वास संपादन केला, मात्र नंतर त्याच्या वर्तनामागील फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार आणि महिलांच्या शोषणासारख्या गंभीर बाबी उघडकीस आल्या. ही घटना निश्चितच चिंताजनक आहे. सुसंस्कृत महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या ढोंगी प्रवृत्तींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. समाजात श्रद्धा, अध्यात्म यांना एक वेगळे स्थान आहे. अनेक लोक मानसिक आधार, मार्गदर्शन, आशेच्या शोधात अशा व्यक्तींवर विश्वास ठेवतात. पण जेव्हा हाच विश्वास काही लोक आपल्या स्वार्थासाठी वापरतात, तेव्हा तो केवळ व्यक्तीगत फसवणूक राहत नाही, तर संपूर्ण समाजाच्या नैतिकतेवर आघात करतो. अशोक खरातसारख्या घटनांमुळे खऱ्या अर्थाने समाजासाठी काम करणाऱ्या थोर व्यक्ती, समाजसेवक, आध्यात्मिक मार्गदर्शकांवरही संशय निर्माण होतो.

या प्रकरणात काही राजकीय तसेच शासकीय घटकांचाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असल्याच्या चर्चा आहेत. जर हे खरे असेल, तर ही बाब अधिक गंभीर ठरते. कारण जनतेने ज्यांच्यावर विश्वास ठेवून सत्ता दिली आहे, त्यामध्ये अशा प्रकारचे नेते, लोक असतील, तर ते समाजासाठी, लोकशाहीसाठी धोकादायक आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष चौकशी होणे अत्यंत अत्यावश्यक आहे. मात्र या सर्वांमध्ये एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मराठी माध्यमांची भूमिका. गेल्या काही दिवसांपासून अनेक वृत्तवाहिन्या, डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर या प्रकरणाचे सतत आणि अतिरेकी कव्हरेज सुरू आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत एकाच विषयावर चर्चा, वादविवाद, आरोप-प्रत्यारोप यांचा भडिमार होताना दिसतो. यामुळे प्रेक्षकांना संपूर्ण वास्तव समजण्याऐवजी एक प्रकारचा संवेदनशीलतेचा थकवा (सेन्सेशनल फटीग) येतो.

माध्यमांचे काम केवळ बातम्या देणे नाही, तर समाजाला योग्य दिशा देणेही आहे. एका गंभीर प्रकरणाची माहिती देणे आवश्यक आहे, पण त्याचे अतिरेकी सादरीकरण करून टीआरपी मिळवण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही. महाराष्ट्रात शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, पर्यावरण यांसारख्या अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सकारात्मक गोष्टी घडत आहेत. त्या देखील तितक्याच प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. याशिवाय, अशा प्रकरणांमुळे एखाद्या विशिष्ट धर्माबद्दल किंवा श्रद्धांबद्दल नकारात्मक वातावरण निर्माण होऊ नये, याची काळजी घेणेही माध्यमांची जबाबदारी आहे. काही भोंदू व्यक्तींच्या चुकीच्या कृत्यांमुळे संपूर्ण धार्मिक परंपरा किंवा श्रद्धा यांना दोष देणे अन्यायकारक आहे. विशेषतः हिंदू धर्मात अनेक संत, विचारवंत, समाजसुधारकांनी समाजासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेणे, त्यांची सकारात्मक उदाहरणे पुढे आणणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

समाजानेही अशा घटनांमधून धडा घेणे गरजेचे आहे. अंधश्रद्धा, व्यक्तिपूजा, आंधळा विश्वास यामुळे अनेकदा लोक स्वतःच संकटात सापडतात. त्यामुळे विवेक, प्रश्न विचारण्याची सवय, मिळालेल्या माहितीची पडताळणी करणे आवश्यक आहे. सरकारनेही अंधश्रद्धा निर्मूलनासाठी, लोकजागृतीसाठी अधिक प्रभावी पावले उचलली पाहिजेत. एकूणच, अशोक खरात प्रकरण हे समाजासाठी एक इशारा आहे. अशा ढोंगी प्रवृत्तींवर कठोर कारवाई व्हावी, दोषींना शिक्षा व्हावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात. त्याचबरोबर माध्यमांनीही जबाबदारीने वागून संतुलित, वस्तुनिष्ठ आणि सकारात्मक पत्रकारितेला प्राधान्य द्यावे. कारण शेवटी, माध्यमे ही समाजाचे आरसे असतात. त्या आरशात सत्य, संवेदनशीलता, संतुलन दिसणे अत्यावश्यक आहे.

**सुहास बेलापूरकर,**
**चेंबूर, मुंबई**
**मो.नं. ९८९२५१६८१०**

# राजहंसच्या मिशन ५० लिटर मुळे दुसरी दुग्ध क्रांती - दलजीतसिंग




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुका हा दुधाचा तालुका म्हणून ओळखला जात असून, आगामी काळामध्ये पंजाबप्रमाणे दुग्ध क्षेत्रात क्रांती करण्याकरता रणजीतसिंह देशमुख यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या मिशन ५० लिटर क्षमतेच्या गाई निर्मितीमुळे राज्यात दुसरी दुग्ध क्रांती होईल, असे गौरव उद्गार पंजाब प्रोग्रेसिव्ह डेअरी फार्मर असोसिएशनचे अध्यक्ष दलजीतसिंग गिल यांनी काढले आहेत. तर कमी गाई, जास्त दूध हे सूत्र आगामी काळात वापरा, असे आवाहन माजी मंत्री थोरात यांनी केले आहे.

वसंत लॉन्स येथे संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाच्या वतीने मिशन ५० लिटर दुग्ध क्रांती पुन्हा एकदा या तालुक्यातील १५०० युवक दूध उत्पादकांच्या कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी बोलताना पंजाब पीडीएफएचे अध्यक्ष दलजीतसिंग गिल म्हणाले की, पंजाब हे राज्य कृषी व दूध उत्पादनामध्ये देशात अग्रेसर आहे. कृषी क्षेत्रामध्ये पंजाबने केलेले संशोधन हे संपूर्ण देशामध्ये जात आहे. रणजीतसिंह देशमुख २००९ पासून पंजाबमधील दूध उत्पादकांच्या संपर्कात असून, त्या माध्यमातून एमडीएफ गोठा, मुरघास या संकल्पना महाराष्ट्रात राबवल्या गेल्या आहेत. महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुका हा दुधाचा तालुका म्हणून ओळखला जातो. आगामी काळामध्ये पन्नास लिटर दूध निर्मिती हे मिशन घेऊन संगमनेरमधून काम सुरू झाले आहे. हा महाराष्ट्रासाठी संगमनेर पॅटर्न ठरणार आहे.या कामांमध्ये पंजाबचे शेतकरी सर्वतोपरी मदत करतील, असे सांगताना पंजाबी आणि मराठा यांनी एकत्र लढून कायम देशहिताचे काम केले असल्याचे ते म्हणाले.

तर माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, १९७८ मध्ये पंजाबमधून गाई आणून आपण दूध उत्पादन सुरू केले. दूध संघाचे जे चेअरमन आतापर्यंत झाले, त्यांनी आतापर्यंत खूप चांगले काम केले. याचबरोबर दूध संघाच्या माध्यमातून तालुक्याची अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. संघाच्या इतिहासातील हा अत्यंत सुंदर कार्यक्रम असून, रणजीतसिंह देशमुख यांनी मुक्त संचार गोठा आणि मुरघास ही संकल्पना अत्यंत प्रभावीपणे राबविली. याचबरोबर कोरोना संकट काळामध्ये त्यांच्या पुढाकारातून दररोज १० लाख लिटर दुधाची पावडर सरकारने बनवली, त्यामुळे शेतकऱ्यांना एकही दिवस बंद न घेता दूध पुरवठा सुरू ठेवता आला. दूध व्यवसायामध्ये कमी गाई आणि जास्त दूध हे सूत्र आपल्याला राबवावे लागणार आहे. मिशन ५० लिटर हा अत्यंत चांगला उपक्रम असून, ही सर्वांनी मोहीम म्हणून राबवा.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........................ 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

## मंत्रालयात 'तोतया सल्लागार' संगमनेरचा गुंजाळ पोलीसांच्या ताब्यात

तालुक्यातील निमगाव भोजापूर येथील दत्तात्रय केशव गुंजाळ या तरुणाने थेट मंत्रालय आणि विधिमंडळ परिसरात 'मुख्यमंत्री कार्यालयाचा सल्लागार' असल्याचा बनाव करत मुक्तपणे वावर केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बनावट ओळखपत्रे आणि खोटी माहितीच्या आधारे उच्चस्तरीय विभागात प्रवेश मिळवणाऱ्या या तोतयाला अखेर मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत त्याला मदत करणाऱ्या बोगस कामांमध्ये गुंतलेल्या इतरांनाही बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

गुंजाळने केवळ मंत्रालयातच प्रवेश मिळवला नाही, तर अनेक मंत्र्यांसोबत छायाचित्रे काढून स्वतःची 'पोहोच' असल्याचा आभास निर्माण केला होता. या छायाचित्रांचा वापर करून त्याने दबाव तंत्र राबवले का? आणि एवढ्या संवेदनशील ठिकाणी त्याचा वावर इतका वाढला कसा? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. दरम्यान, गुंजाळच्या अटकेनंतर निमगाव भोजापूरसह संगमनेर तालुक्यातून त्याच्या कथित गैरकृत्यांची माहिती बाहेर येऊ लागली आहे. संगमनेरमधील एका शिक्षण संस्थेत नोकरी देण्याचे आमिष दाखवत त्याने अनेकांकडून लाखो रुपये उकळल्याची चर्चा रंगली आहे. एवढेच नव्हे तर एका पतसंस्थेतही त्याच्याकडून आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी पुढे आल्या असून, त्यावर ठोस कारवाई न झाल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. गावकऱ्यांच्या मते, राजकीय नेत्यांसोबतची छायाचित्रे दाखवून गुंजाळने अधिकाऱ्यांवर दबाव टाकला आणि त्यामुळेच त्याच्यावर वेळेवर कारवाई झाली नाही. बनावट कागदपत्रांच्या आधारे मंत्रालयात घुसखोरी करणे हा अत्यंत गंभीर सुरक्षा भंग असून, अटकेपूर्वी त्याने आणखी किती लोकांना गंडा घातला याचा तपास होणे गरजेचे आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे राज्य सरकार आणि मंत्रिमंडळाची प्रतिमा धोक्यात आली आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्र्यांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन अशा फसवणूक करणाऱ्या प्रवृत्तींचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

# चाकूने भोकसून खून, वडगाव घटनेतील एकाला जन्मठेप, दोघांना दहा वर्षांची शिक्षा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथे घडलेल्या बहुचर्चित खुनाच्या घटनेतील आरोपींना न्यायालयाने शिक्षा सुनावली असून मुख्य आरोपीला जन्मठेप तर अन्य दोघांपैकी एका आरोपीला १० वर्षांची सक्तमजुरी व तिसऱ्या आरोपीला १० वर्षे साध्या कैदेची शिक्षा ठोठावली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, २२ जून २०२० रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास वडगावपान येथील फिर्यादी प्रतीक बाळासाहेब चत्तर यांच्या 'कमळेश्वर चिकन शॉप'वर ही घटना घडली होती. आदल्या दिवशी झालेल्या भांडणावरून पोलिसांत दिलेल्या तक्रारीचा राग मनात धरून आरोपी राहुल देविदास काळे, देविदास हरिभाऊ काळे आणि रामनाथ सावित्रा गायकवाड हे तेथे आले होते. त्यांनी फिर्यादीचे वडील बाळासाहेब चत्तर यांना शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली. याच भांडणादरम्यान आरोपी राहुल काळे याने बाळासाहेब चत्तर यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या डोक्यावर, पाठीवर आणि छातीवर चाकूने सपासप वार केले. यात त्यांचा मृत्यू झाला. वडिलांना वाचवण्यासाठी गेलेला मुलगा प्रतीक याच्यावरही राहुलने चाकूने वार करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या हल्ल्यानंतर गंभीर जखमी अवस्थेत प्रतीक चत्तर याने खासगी हॉस्पिटलमध्ये दिलेल्या जबाबावरून संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गु.र.नं. २९४/२०२० नुसार भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, २०१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक पी. वाय. कादरी यांनी अत्यंत जिद्दीने करून आरोपींविरुद्ध भौतिक, परिस्थितीजन्य आणि वैद्यकीय पुरावे उपलब्ध केले व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या खटल्याची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. बी. गव्हाणे यांच्यासमोर पार पडली. सरकारी वकील जयंत दिवटे यांनी कोर्टासमोर एकूण १५ साक्षीदार तपासले. यामध्ये विशेषतः प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप कचेरीया आणि तपास अधिकारी यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. सरकारी पक्षाचा प्रबळ युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपींना कठोर शिक्षा सुनावली आहे. मुख्य आरोपी राहुल देविदास काळे याला कलम ३०२ अन्वये जन्मठेप आणि २० हजार रुपये दंड, कलम ३०७अन्वये १० वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंड, कलम २०१ अन्वये ३ वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंड आणि कलम ३२४ अन्वये २ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. तसेच आरोपी देविदास काळे याला १० वर्षे साधी कैद आणि ७६ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून आरोपी रामनाथ सावित्रा गायकवाड याला १० वर्षे सक्तमजुरी व १६ हजार रुपये दंडाची शिक्षा देण्यात आली आहे. या दंडातून ३ हजार रुपये सरकारजमा करून उर्वरित रक्कम फिर्यादीच्या कुटुंबाला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

## यशोदा दामोदर सातपुते यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - संगमनेर तालुक्यातील राजापूर येथील जुन्या पिढीतल्या जेष्ठ महिला यशोदा दामोदर सातपुते यांचे शुक्रवार दिनांक २७ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्या ८२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. राजापूर म्हाळुंगी तीरावर त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कै. यशोदा सातपुते यांनी जुन्या सातवीपर्यंत शिक्षण घेतले होते. त्यावेळी चांगले शिक्षण असणाऱ्या मोजक्या महिलांमध्ये त्यांचा समावेश होता. पती दामोदर सातपुते हे शिक्षक होते. त्यामुळे हे सुशिक्षित आणि सुसंस्कृत कुटुंब म्हणून ओळखले जात होते. यशोदा सातपुते यांनी नोकरी न करता गृहिणी म्हणून पतीला मोलाची साथ दिली व मुलांना उच्च शिक्षण व संस्कार दिले. त्यामुळेच त्यांची मुले सुधीर सातपुते हे नाशिक येथे नायब तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत, राजेंद्र सातपुते हे लोणावळा येथे वेट एंजॉय मध्ये मॅनेजर तर शेखर सातपुते हे येथील धृव कडमीमध्ये कार्यरत आहेत. मुलगी मंदाकिनी एकनाथ धाकतोडे या सासरी सुखी आहेत. पुतणे सुरज, सुमीत तसेच १३ नातू आणि ८ पणतू असा मोठा परिवार त्यांच्या पश्चात आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. यशोदा सातपुते यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## 'मनातलं पानावर' अरविंद गाडेकर यांच्या कथासंग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - अक्षरसागर साहित्य मंच गारगोटी, कोल्हापूर यांचे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार २०२५ साहित्यिकांना जाहीर झाले आहेत. कादंबरी, कवितासंग्रह, संकीर्ण, बालसाहित्य या प्रकारातील पुरस्कार मंचाचे अध्यक्ष डॉ. मा. ग. गुरव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक) व पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्य यांनी जाहीर केले आहे.

संगमनेरचे प्रसिद्ध व्यंगचित्रकार, लेखक व व्याख्याते अरविंद गाडेकर यांना त्यांचे स्वलिखित कथासंग्रह 'मनातलं पानावर' या कथासंग्रहास राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांनी अनेक लेख लिहिले असून त्यांच्या लेख अनेक दैनिक, साप्ताहिकात प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कथा समाज जीवनातील, सामान्य माणसातील रोजच्या निगडित घटनावर आधारित असतात. अरविंद गाडेकर हे संगमनेर साहित्यिक मंडळाचे अध्यक्ष, तसेच अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्था,संगमनेर शाखेचे कार्याध्यक्ष आहेत. संगमनेर वाचन कट्टा आणि संगमनेर साहित्यिक मंडळाचे वाचन मंडळ या माध्यमातून वाचन चळवळ व साहित्यिक चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी ते सतत कार्यरत असतात. 'साहित्य कुंज' या मासिकाचे ते संपादक आहेत. त्यांच्या या पुरस्काराबद्दल समाजातील सर्वस्थरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.अरविंद गाडेकर यांना प्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संतोष खेडलेकर, दै. युवावार्ताचे संस्थापक संपादक किसन भाऊ हासे व साहित्यिक, लेखक अनिल देशपांडे आणि संगमनेर साहित्यिक मंडळाचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य असते.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees - 3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग • किडनी विकार
• मधुमेह व हृदयरोग • मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• दमा व श्वसनाचे विकार • सर्पदंश व विषबाधा
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार • बालरोग चिकित्सा विभाग
• जनरल सर्जरी • प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया • संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25